**University of Mumbai**

अवैध साधन चौकशी विभाग
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी ,सांताक्रुज(पू)
मुंबई ४०० ०९८.

**क्र.परीक्षा/अवैध साधन/2084/२०१७**

**परिपत्रक :—**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे संचालक/समन्वयक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, परीक्षेच्या काळामध्ये परीक्षा केंद्राना भेटी देण्यासाठी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या भरारी पथकास खालील बाबी निदर्शनास आलेल्या आहेतः—

- परीक्षा चालु असताना वर्ग खोल्यांच्या कोपऱ्यांमध्ये Copying Material पडलेले असणे
- परीक्षार्थीस पुरविण्यात आलेल्या उत्तरपत्रिकेवर परीक्षा केंद्राच्या नावाचा शिक्का नसणे तसेच वरीष्ठ व कनिष्ठ पर्यवेक्षकाची सही नसणे
- परीक्षार्थींच्या ओळखपत्रावर संबंधित महाविद्यालयाचा नावाचा शिक्का व प्राचार्यांची सही नसणे
- परीक्षा चालु असलेल्या वर्ग खोल्यांमधील भिंतींवर तसेच बाकांवर परीक्षेशी निगडीत मजकुर लिहिलेला असणे
- परीक्षार्थींचे आसन क्रमांक बाकांवर नमुद नसणे
- परीक्षा चालु असताना परीक्षा केंद्रावर केंद्र प्रमुख उपस्थित नसणे
- परीक्षा केंद्रावर भरारी पथकास आवश्यक ते सहकार्य न मिळणे

उपरोक्त बाबी परीक्षा सुरळीत व निकोप वातावरणात संपन्न होण्याच्या दृष्टीने विहित केलेल्या नियमांशी सुसंगत नाही.

तरी या बाबी यापुढे निदर्शनास आल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, याची आपण नोंद घ्यावी.

**तसेच पुढे असेही कळविण्यात येते की, परीक्षार्थींना पुरविण्यात आलेल्या उत्तरपत्रिकांवर नमुद असलेला संगणीकृत बारकोडस्वर Pin Staple तसेच खाडाखोड/क्रॅश करू नये अशा सुचना विदयार्थ्यांना देण्यात याव्यात.**

**Copying Case संबंधित असलेल्या उत्तरपत्रिका, Copying Material आणि कनिष्ठ व वरिष्ठ पर्यवेक्षकांचा अहवाल एका वेगळया पाकिटात सील बंद करून या पाकिटावर अवैध साधन सामुग्री चौकशी कक्ष, परीक्षा भवन, मुंबई विद्यापीठ असे लिहुन पाठविण्यात याव्यात.**

**वरील सर्व बाबींची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी ही विनंती.**

(दिपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

स्थळ : मुंबई.
दि. : १२ जानेवारी, २०१७.

अ. प्रतः—

१. मुंबई विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित असलेल्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक तसेच विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे संचालक/समन्वयक

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषितः—

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग
३. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग

क. प्रत माहितीसाठी अग्रेषितः—

१. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
२. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
३. मा. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव व परीक्षा नियंत्रक यांचे स्विय सहायक

.....................